# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ४७ वा ❑ शनिवार दि.२२ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## ग्रंथोत्सवास उत्साहात प्रारंभ

### पालकांनी स्वतः वाचावे मग मुलांवर वाचनाचे संस्कार करावे-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी





ज्योतिर्मय 📖 साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** मुले वाचत नाहीत अशी तक्रार हल्ली पालक करतात. मुलांवर वाचनाचे संस्कार करायचे तर पालकांनी आधी पुस्तकं वाचायला हवीत, तरच मुले त्यांचे अनुकरण करतील, आणि पुढच्या पिढीत वाचन संस्कृती रुजेल,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्यावतीने शुक्रवार दि.२१ व शनिवार दि.२२ असे दोन दिवस ग्रंथोत्सव २०२४ चे आयोजन येथील समता दर्शन वाचनालय सभागृह चुन्नीलाल पेट्रोल पंप समोर समता नगर येथे करण्यात आले आहे. ग्रंथोत्सवाचे उद्घाटन आज जिल्हाधिकारी स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. दासू वैद्य हे होते. तर ज्येष्ठ साहित्यिक प्रकाशक बाबा भांड, डॉ. रा. शं. बालेकर, गुलाबराव मगर, अण्णा वैद्य, प्रशांत गौतम, पत्रकार सुहास सरदेशमुख, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे आदी उपस्थित होते.

ग्रंथोत्सवाचा प्रारंभ क्रांती चौकातून ग्रंथदिंडीद्वारे करण्यात आला. मानव विकास आयुक्तालय उपायुक्त मिलिंद नारिंगे, ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, साहित्यिक डी.एस.काटे, कुंडलिक अतकरे आदी मान्यवर तसेच शालेय विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी यावेळी विविध वेषभूषा करुन आपला सहभाग दिला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते ग्रंथोत्सवातील ग्रंथदालनांचे उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी ग्रंथदालने असून तेथे ग्रंथ प्रदर्शन व विक्रीची सोय आहे. ग्रंथप्रेमींनी ग्रंथ पाहण्या व खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती.

दीपप्रज्वलनाने मुख्य सोहळ्यास सुरुवात झाली. यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व विषद केले. ते म्हणाले की, आपण संतांची भुमि म्हणतो मात्र प्रत्यक्षात संतांचे साहित्य वाचत नाही. बौद्धिक प्रगल्भतेसाठी वाचन करणे गरजेचे आहे. कविता, गीत, कथा, कादंबऱ्या, वैचारीक ग्रंथ, क्रमिक पुस्तके असे कोणत्याही स्वरुपातील साहित्य हे संस्कारासाठी महत्त्वाचे असते. अनेक घरांमध्ये शोकेस मध्ये पुस्तके ठेवलेली असतात. पुस्तके हे शोभेची वस्तू नसून ते वाचण्यासाठी व आत्मसात करण्यासाठी आहे. वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी लहान लहान स्वरुपात ग्रंथोत्सव आयोजीत करुन मुलांपर्यंत पुस्तके पोहोचवावीत. त्यांची व ग्रंथांची भेट घडवावी,असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी साबळे यांनी केले तर सुत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले.

## भाषेचा विकास ही निरंतर प्रक्रिया-डॉ.मिलिंद दुसाने



ज्योतिर्मय 📖 साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** भाषेची निर्मिती ही उत्पादन प्रक्रियेशी संबंधित आहे. जोपर्यंत उत्पादन आणि त्याद्वारे जीवन जगण्याचा प्रवाह सुरु आहे तोवर भाषानिर्मिती होत राहणार. भाषेचा विकास ही निरंतर प्रक्रिया असून या भाषांवर आधारीत ज्ञानव्यवहाराची महत्त्वाची केंद्रे म्हणून ग्रंथालयांना विशेष महत्त्व आहे,असे प्रतिपादन जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी आज ग्रंथोत्सवातील परिसंवादात केले.

ग्रंथोत्सवाच्या दुपारच्या सत्रात 'मराठी भाषेच्या विकासात ग्रंथालयाचे योगदान' याविषयावर परिसंवाद आयोजीत करण्यात आला. अध्यक्षस्थानी जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने हे होते. तर डॉ. रा.श बालेकर, अनिल लहाने, गुलाबराव मगर, कुंडलिक कतकरे यांनी सहभाग घेतला. परिसंवादात डॉ.बालेकर यांनी ग्रंथालयांची आवश्यकता व त्याद्वारे लोकांना मिळणारी सेवा याबाबत माहिती दिली. तर अनिल लहाने यांनी वाचन संस्कृतीत ग्रंथालयांचे महत्त्व व त्याद्वारे भाषाविकासाची प्रक्रिया विषद केली. कुंडलिक कतकरे यांनी साहित्य निर्मिती व त्या साहित्याचा प्रसार करण्यात ग्रंथालयांची भुमिका मांडली. गुलाबराव मगर यांनी ग्रंथालयांचा विकास, त्यांच्या व्यवस्थापनातील अडचणी यावर प्रकाश टाकला.

डॉ. दुसाने म्हणाले की, ज्यावेळी समाजातील काही घटकांना लिहिणे वाचण्यास प्रतिबंध करणारी कुप्रथा होती. त्यावेळेसही ह्या घटकांनी आपल्या जीवन जगण्याच्या प्रक्रियेत भाषा विकसित करीतच होते. अनेक घटकांच्या दैनंदिन व्यवहारातील वेगवेगळे शब्द आपणास माहिती नसतात. कारण त्यांचे जीवन आपणास माहिती नाही. ह्याच वर्गातील लोक शिकले, लिहू लागले त्यांनीही साहित्य निर्मिती केली आणि नंतर त्यांचे शब्द मराठी भाषेत आले आणि मग आपली भाषासमृद्ध झाली. ही प्रक्रिया निरंतर सुरुच असते. ही भाषा विविध साहित्याच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचविणारे ग्रंथालये व त्यातील ग्रंथपाल हे या प्रक्रियेतील महत्त्वाचे दुवा होत,असेही डॉ. दुसाने यांनी सांगितले. सूत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले.

ग्रंथोत्सवात शनिवार दि.२२ रोजी सकाळी ११ वा. 'भारतीय संविधान हक्क आणि कर्तव्य' या विषयावरील परिसंवाद कार्यक्रमात अध्यक्षस्थानी डॉ.जयदेव डोळे असणार आहे. डॉ. ऋषिकेश कांबळे, डॉ.ह.नि. सोनकांबळे, ॲड बाबा सरदार उपस्थित राहणार आहे. दुपारी २ वा. कथाकथन कार्यक्रमात अध्यक्षस्थानी उत्तम बावस्कर सहभाग गेनू शिंदे, सरदार जाधव, श्रीमती ज्योती सोनवणे असणार आहे. दुपारी ४ वा. समारोप समारंभास प्रमुख उपस्थिती ज्येष्ठ संपादक प्रविण बर्दापुरकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, हास्य कवी डॉ. विष्णू सुरासे, जिल्हा ग्रंथालय अध्यक्ष सुभाष सोळंके उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमास ग्रंथप्रेमी, वाचकांनी, विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर ग्रंथोत्सव – २०२४ समन्वय समितीचे अध्यक्ष सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, सदस्य शिक्षणधिकारी (माध्य) श्रीमती अश्विनी लाटकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने, कार्यवाह मराठवाडा साहित्य परिषद डॉ.दादा गोरे, प्रकाशक संघटना कुंडलिक अतकरे, जिल्हा ग्रंथालय संघ अध्यक्ष सुभाष सोळंके, सदस्य सचिव जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष धो. साबळे, संयोजन सदस्य ज्ञानेश्वर पैठणे, दीपक काळे, संजीव ठाकूर, श्रीमती उज्वला नाटकर आदींनी केले आहे.

## विशेष लेख...

### बालगुन्हेगारीचे वाढते प्रमाण चिंताजनक

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य


देशातील अल्पवयीन मुलांकडून गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. गेल्या दशकातील गुन्हेगारी दराचा अभ्यास दर्शवितो की एकूण गुन्ह्यांच्या तुलनेत बालगुन्हेगारीची टक्केवारी १० वर्षांच्या कालावधीत केवळ ०.७% वाढली असली तरी, बलात्काराचा गुन्हा करणाऱ्या अल्पवयीन मुलांची टक्केवारी चिंताजनक म्हणजे ५३%. ने वाढली आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोने वर्षानुवर्षे प्रकाशित केलेल्या आकडेवारीत वाढत्या गुन्ह्यांबरोबरच, अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारीची प्रवृत्ती वाढत असल्याचे तथ्य देखील समोर येत आहे. पुण्यातील सातवीच्या एका विद्यार्थ्याने त्याच्या वर्गमित्रावर बलात्कार करून तिची हत्या करण्यासाठी दुसऱ्या मित्राला १०० रुपयांचा ठेका दिल्याची बातमी धक्कादायक आहे. विद्यार्थिनीचा दोष फक्त एवढाच होता की तिने आरोपी विद्यार्थ्याने रिपोर्ट कार्डवर पालकांच्या सहीची खोटी तक्रार शिक्षिकेकडे केली होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शाळा प्रशासनही हे गंभीर प्रकरण दाबण्यात व्यस्त होते. मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आता संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू केला आहे, परंतु या संपूर्ण घटनेने मुलांमध्ये वाढत्या गुन्हेगारी मानसिकतेकडे लक्ष वेधले आहे, ज्यामुळे केवळ आपल्या सामाजिक रचनेवर परिणाम होत नाही तर आपल्या मुलांचे भविष्यही धोक्यात येत आहे. खरं तर, या समस्येच्या मुळाशी मुलांवर वर्चस्व गाजवणारा मानसिक ताण, सहनशीलतेचा अभाव, कौटुंबिक आणि सामाजिक वातावरणातील बदल, इंटरनेट आणि सोशल मीडियाचे व्यसन अशी अनेक प्रमुख कारणे आहेत.

ही घटना कदाचित वेळेत उघड झाली असेल पण त्यामुळे अनेक प्रश्नही निर्माण झाले आहेत. शैक्षणिक संस्था ही संस्कृतीची केंद्रे मानली जातात. अशा वृत्तीच्या मुलांवर लक्ष का ठेवले जात नाही? शाळा प्रशासन हे प्रकरण का दाबण्याचा प्रयत्न करत होते? बदनामीच्या भीतीमुळे अनेकदा गुन्हेगारी घटना उघड होत नाहीत. परंतु संबंधित लोकांनी हे समजून घेतले पाहिजे की असे करून ते एक प्रकारे गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या मुलांना संरक्षण देत आहेत. बिघडत्या कौटुंबिक आणि सामाजिक वातावरणामुळे मुले मानसिक ताण आणि नैराश्यासारख्या समस्यांनी वेढलेली असतात. पाश्चात्य देशांमधील शाळांमध्ये मुलांवर होणाऱ्या हिंसक वर्तनाच्या बातम्या आल्या आहेत, परंतु आपल्या देशातही अशा घटना चिंतेचा विषय आहेत.

हे देखील समजून घेतले पाहिजे की मुले गुन्हेगार बनण्यास काही प्रमाणात बाह्य घटकच नव्हे तर कौटुंबिक वातावरण देखील जबाबदार आहे. मुलांना प्रत्येक चांगल्या किंवा चुकीच्या गोष्टीत कुटुंबाचा पाठिंबा देखील त्यांना चुकीच्या मार्गावर नेतो. मुलांना सहिष्णुता आणि आदर्श शिकवले पाहिजेत. घरी आणि शाळेत त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. मुलांचे मानसिक आरोग्य देखील वेळोवेळी तपासले पाहिजे. मुलांना योग्य मार्गावर जाण्यास मदत करणारे वातावरण त्यांना दिले पाहिजे. यामध्ये शिक्षक आणि पालकांसोबतच समाज आणि सरकारचीही मोठी भूमिका आहे.

## लक्षवेधी छायाचित्र....



आम्ही कोण? म्हणून काय पुसता दाताड वेंगाडुनी?

(छाया सौजन्य :फेसबुक)

## जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कोतापूर न. १ शाळेला साप्ताहिक प्रकट महाराष्ट्र आणि वृत्तवाहिनी च्या वतीने आदर्श शाळा पुरस्कार





ज्योतिर्मय 📖 साहित्य

आदर्श शाळा ही केवळ शिक्षकांनीच घडवता येत नाही तर त्यामध्ये संपूर्ण समाजाचा सहभाग आवश्यक असतो. शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ यांनी एकत्र येऊन शिक्षणाचा दर्जा सुधारला तरच विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडू शकते . शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा कणा आहे आणि त्याला अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे अशा शाळेंमधून शिक्षण घेणारी मुले ही भविष्यात एक जबाबदार नागरिक होऊन समाजाच्या उन्नतीस हातभार लावतील. " विद्या हिच खरी संपत्ती आहे जी जितकी वाटली तितकी वाढते " आणि याचे ज्वलंत उदाहरण आहे राजापूर तालुक्यातील कोतापूर गाव. जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा कोतापूर नंबर एक व इतर तीन शाळेतून शिकणारे विद्यार्थी. गावातील लोक कष्टाळू आणि त्यातूनच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे जातीनिशी लक्ष देणारे. आणि त्यांच्या कष्टांना साथ मिळते ती येथील शिक्षक वर्गाला. कामाशी अतिशय प्रामाणिक राहून या गावखेड्यातील विद्यार्थी अनेक तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय पातळीवरती अनेक क्षेत्रात नावारुपाला आणण्याचा मोलाचा वाटा असतो तो या शिक्षकांचा... सलग दोन वर्षे नासा इस्रोसाठी निवड झालेले विद्यार्थी हे केवळ येथील विद्यार्थी शिक्षक व पालक यांच्या खऱ्या योगदानामुळेच आणि या सर्वांच्या यशाची, मेहनतीची दखल घेतली ती प्रकट महाराष्ट्र साप्ताहिक व प्रकट महाराष्ट्र युट्युब वृत्तवाहिनीने... या सर्वांचा दिनांक १५ मार्च २०२५ रोजी विद्यार्थी, शिक्षक, पालक यांचा यथोचित गुणगौरव प्रकट महाराष्ट्र साप्ताहिक व वृत्तवाहिनीचे संपादक श्री दत्ताराम दळवी साहेब, रवींद्र जाधव साहेब यांच्या वतीने करण्यात आला.

प्रामुख्याने नासा इस्रोसाठी निवड झालेल्या विद्यार्थी शमिका शेवडे, देवयानी आग्रे आणि शिवाली घुमे, शासकीय रेखा कला प्रवीण विद्यार्थी – दिव्यराज तरळ, आशिष वालम, तेजस सुतार आणि नितेश नवाथे. जिल्हास्तरीय खोखो संघात निवड झालेला अथर्व मांडवकर, नृत्य अनुभूती नॅशनल अवॉर्ड वर्ल्ड परफॉर्मिंग चॅम्पियनशिप भरतनाट्यम मध्ये प्राविण्य मिळवलेली शुभ्रा आंब्रे तसेच राजापूर व कणकवली तालुक्यातील तालुकास्तरीय वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या रक्षा जांगळी. समूह गायन स्पर्धेसाठी..

१) आनम महंमद मोनये. २)श्रावणी मंगेश जाधव. ३)स्वरा सुधाकर जानस्कर. ४) मेघा दिपक जानस्कर. ५) पायल सूर्यकांत चौगुले. ६) स्वरा सुधाकर जानस्कर – वक्तृत्व स्पर्धा या विद्यार्थ्यांचा समावेश होता. सदरचा कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी प्रकट महाराष्ट्राची संपूर्ण टीम, विद्यार्थी, शिक्षक पालक व ग्रामस्थ यांचे मोलाचे योगदान लाभले. या विद्यार्थ्यांचा समावेश होता... सदरचा कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी प्रकट महाराष्ट्राची संपूर्ण टीम, विद्यार्थी, शिक्षक पालक व ग्रामस्थ यांचे मोलाचे योगदान लाभले.





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...


## व्यक्तीच्या वेगळेपणाचे महत्व

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या संवादातून, लेखनातून, देहबोलीद्वारे आणि विविध क्रिया–प्रतिक्रियांतून आपण व्यक्त होत असतो. व्यक्त न होणाऱ्या व्यक्तीची घुसमट वाढत जाते. मोकळेपणानं मनांतील विषय एखाद्याला सांगितले कि मनावरचा ताण, दडपण कमी झाल्याचं देखील जाणवतं. ह्या मोकळ्या होण्यातून आपल्या समस्यांचं निराकरण होत जातं. काहीवेळा उद्भवलेल्या प्रश्नांची उकल होत जाते. मनातील भय, न्यूनगंड दूर होण्याच्या दृष्टीनं मोकळेपणानं आपल्या मनांतील शंका व्यक्त करणं उपयुक्त ठरतं. आपल्याला पडलेले प्रश्न केवळ आपल्याच भ्रम आणि संभ्रमामुळे निर्माण होत असतात. प्रत्येक वेळेला प्रत्येक प्रश्नाची उत्तरं सारखी नसतात, प्रत्येकाचे प्रश्न निराळे असतात, उत्तरेही प्रत्येकासाठी भिन्न असतात. जसं व्यक्ती तितक्या प्रकृती तसंच, जसे प्रश्न तशी त्यांच्यासाठी उत्तरे, हे लक्षात घेणं जरुरीचं असतं. एखाद्या समस्येचं उत्तर सर्वांनाच लागू होतं असं नाही, हेही समजून घेणं आवश्यक असतं.

व्यक्त होणारीच व्यक्ती असते; अशाच व्यक्तीचं व्यक्तिमत्व चार चौघांपेक्षा निराळं असतं. खरं तर, व्यक्त न होणारा जीव ह्या भूतलावर सापडणे विरळाच. जन्माला आलेला प्रत्येक जीव काही ना काही प्रकारे व्यक्त होण्याचा प्रयत्न करतच असतो. ते व्यक्त होणं आवाजाच्या माध्यमातून, लिखित स्वरूपांत, देहबोलीच्या वापरांतून होत असतं. आपल्या अंतर्मनांत येणारे विचार, विषय, घटना, अनुभव आपण अगदी जवळच्या, आपल्या हक्काच्या व्यक्तीजवळ बोलून दाखवत असतो. म्हणजेच एकप्रकारे आपण व्यक्तच होत असतो. तसं करण्यामुळे आपल्या मनांत साठून राहिलेल्या विचार बाहेर पडतात, त्यांना मोकळी वाट करून दिली जाते. निसर्ग नियमानुसार ते गरजेचं असतं.

## दक्षिण भारतातील अप्रतिम मंदिरे ( भाग एक)





ज्योतिर्मय साहित्य

होयसळ घराण्यातील कलाप्रेमी विष्णुवर्धन या राजाने चोला राजांवरील लढाईत मिळवलेला विजय साजरा करण्यासाठी या मंदिराचे बांधकाम सुरू केले आणि नंतर विष्णुवर्धनचा मुलगा नरसिंह पहिला आणि नातू वीरबल्लाळ दुसरा यांनी या मंदिराचे उर्वरित बांधकाम पूर्ण केले. असे तीन पिढ्यांनी हे बांधकाम पूर्ण केले आहे. या ठिकाणी असणारे गोपूर हे हरिहर दुसरा याचा सेनापती गुंडा याने बांधले. या मंदिरावर काळाच्या ओघात अनेकदा आक्रमण झाले, त्याची नासधूसही करण्यात आली परंतु तरीदखील वेळोवेळी त्याची पुनर्बांधणी करण्यात आली. यासाठी ज्यांनी ही पुनर्बांधणी वेळोवेळी केली त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत. शेकडो वर्षांपासून या ठिकाणी नित्य पूजा आणि धार्मिक उत्सव साजरे केले जातात. हे मंदिर जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट आहे.



अतिशय भव्य असलेल्या परिसराच्या मध्यभागी चेन्नकेशवाचे सुंदर मंदिर आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार पूर्व दिशेला असून त्याच दिशेला आणखी एक प्रवेशद्वार आहे मंदिराच्या परिसराला उंच दगडी भिंतीचे संरक्षण आहे मंदिरासमोर असलेल्या गरुड स्तंभावर गरुडाची मूर्ती हात जोडलेल्या स्थितीत मंदिराकडे तोंड करून उभे आहे ही मूर्ती अत्यंत देखणी आणि प्रमाणबद्ध आहे. पाठीवर पसरलेले पंख, हातावरील बाजूबंदांमध्ये असणारे सर्प, बोटांमधील अंगठ्या, पाठीमागे असलेली प्रभावळ, धनुष्याकृती भुवया, डोक्यावर असलेला मुकुट आणि मानवी देह धारण केलेलं गरुडाचं रूप आपलं लक्ष वेधून घेतं. ही मूर्ती पाहिल्यानंतर हात आपोआप जोडले जातात. या मुख्य मंदिराच्या परिसरातच आणखी मंदिरे, मंडप आणि ओवऱ्या आहेत. मंदिराभोवती प्रदक्षिणा घालण्यासाठी आणि मंदिराच्या मागील भिंतीवर असलेले नक्षीकाम किंवा शिल्पकामाचे निरीक्षण करण्यासाठी, पाहण्यासाठी विस्तीर्ण जागेची सोय आहे. हे मंदिर तीन फूट उंच जगतीवर उभे आहे. जगती म्हणजे उंच चौथरा. मंदिराच्या आवारातच गरुड स्तंभाखेरीज आणखी एक स्तंभ उभा आहे. हा एकाश्म आहे म्हणजे एकाच दगडातून घडवलेला आहे. ४२ मी. उंची असलेल्या या स्तंभाला पाया नसून तो त्याच्या स्तः च्या वजनावर उभा आहे हे विशेष ! या स्तंभाला गुरुत्वाकर्षण स्तंभ असेही म्हटले जाते.

मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर मकर तोरण आढळते मकर म्हणजे एक पौराणिक प्राणी असून त्याचा देह अनेक प्राण्यांपासून बनलेला आहे असे त्या शिल्पावरून दिसते. या शिल्पाच्याच जोडीला भगवान विष्णूंचे मत्स्य, कुर्म, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध आणि कल्की असे दहा अवतार कोरलेले दिसतात. इथेच आपल्याला सिंहावर विजय मिळवणाऱ्या राजाचं शिल्प ही बघायला मिळतं. होयसळ राजे हे अत्यंत शूर होते. त्याचा हा पुरावाच म्हटला पाहिजे. मंदिराच्या प्रवेशद्वारावर आपल्याला रती आणि मदनाचं शिल्प देखील पाहायला मिळतं. पण हे शिल्प एकत्र नसून वेगवेगळे आहे. त्याचा अर्थ असा की कामासारखे विकार मंदिराच्या बाहेरच ठेवूनच पवित्र मनाने आपण मंदिरात प्रवेश करावा. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## विरक्त लक्षण

ज्योतिर्मय साहित्य


भगवंताचे प्रेम ऊदय पावल्याची अवस्था, वासना क्षीण झाल्याची अलीप्तपणाची अवस्था योगाभ्यासाने येणारी अवस्था, ध्यान साधल्यावरची अवस्था, देहाचे भान लोपल्यावर होणारी अवस्था, तुर्या पचनी पडल्यावरची अवस्था यासर्व साक्षात्कार लक्षणाचे ज्ञान विरक्ताला असावे.

विरक्त योगी असावा,योगक्रिया, योगासने, विधी व विधानाचेज्ञान अवगत असावे. विरक्ताकडे आपपर भाव नसावा. सगगळ्यांशी प्रेमाने सौदाहर्याने तन, मन, धन देऊन आदर्शवादी जीवन अंगीकारलेले असावे. तो लोभी नसावा.थोडक्यात काय तर विरक्ताने जगन्मित्र असावे.मोकळे व बंधनमुक्त जीवन जगावे. पण आपल्या पासून कुणालाही त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. शास्त्राच्या सर्व अंगाचा विचार करू, अभ्यास पूर्ण वर्तन करून भगवंत प्राप्तीची ईच्छा असणाऱ्या सर्व समाजाला शुध्द साधन मगर्गाला लावावे. परमार्थ सांगत असताना समाजमनावर जर शंकांचे गारूड असेल तर ते दूर करावे.

विरक्त स्वत:भगवंत भक्तीत लीन झालेला असावा . तो सदवर्तनी,सदाचारी, हठयोगी, ऊत्तम वक्ता, प्रवाहीवाणी, आरोग्यसंपन्न, पराकोटीचा भक्तीमार्ग अवलंबणारा असावा.

मित्रांनो या समासातील संतवचने मला जेवढी समजली, ऊमजली तेवढी श्रोत्यापुढे मांडण्याचा प्रयत्न केला. काही ऊणे असेल तर माझ्या कडे अधिक असेल ते समर्थाच्या चरणांशी भावसुमनांजली समजून वहाते व विरक्त लक्षणनाम समास नववा समाप्त करत आहे.

श्रीराम जय राम जय जय राम
जय जय रघूवीर समर्थ



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## अखंड समाधानाचा मार्ग ।

ज्योतिर्मय साहित्य

चित्तात राखावे समाधान ।। चित्तांत ज्याचे राहिले समाधान । तोच भगवंताचा आवडता जाण ।। ज्याचा विश्वास रामावरी । त्याला समाधान स्वीकारी ।। माझे हित रामाचे हाती हा धरिता विश्वास । समाधान मिळत असे जीवास ।। दु:ख ही परमात्म्याची इच्छा जाणून जो भगवंताचा झाला । त्याला देह प्रारब्धावर टाकता आला ।। प्रारब्धाने देहाची स्थिति । हे सर्वच सांगती । पण त्यात मानता येते सुख समाधान । ध्याता एक रघुनंदन ।। तात्पुरते काही तरी औषध घ्यावे । देहाच्या लोभात न सापडावे ।। माझे सांगणे दुजे नाही । जोवर श्वासोच्छवास देही । तोंवर मुखी नाम पाही ।। तरीपण मी सांगतो एक । ठेवावा रामावर विश्वास । तोच साह्यकारी होईल खास ।।

असावे शुद्ध आचरण । करावे भगवंताचे स्मरण ।। कर्तव्याची ठेवावी जागृति । त्यात भगवंताची राखावी स्मृति ।। नामाविण नाही दुजे साधन । हे सांगत आले सर्व संतजन ।। देहाचे अस्तित्व भगवंतासाठी। याहून नाही दुजी उच्च प्राप्ति ।। देहाचे भोग देहाचे माथी । ऐसे सर्व सांगती । परि एक वाटतसे चित्ता । ते दूर होतील एक भगवंत चिंतिता ।। भगवंतावाचून देहाचे सुखभोग । हे न मानिती साधुसज्जन ।। आता जगणे रामासाठी । हा निश्चय मानावा चित्ती ।। जगातील वैभव ऐश्वर्य संपत्ति । लौकिक आणि कीर्ति । हे परमात्म्यावाचून मातीमोल साधुसंत गणती ।। आजवर झाले कष्ट फार । देहाचा भरवसा धरून थोर ।। देहाचे सुखसौख्य आदरसत्कार । हे प्रारब्धाधीन सत्य जाण ।। मुलींनी खेळ मांडला । परि नाही कामाला आला । तैसा प्रपंची थोर झाला । परमात्म्याचा तो न म्हणावा भला ।। रामापरते सत्य नाही । श्रुतिस्मृति सांगतात हेच पाही ।। आता न ठेवावा जगी भरवसा । राम सखा करावा खासा ।। रामाविण अन्य प्रीति । उपजे देहबुद्धीचे संगती ।। आता राम एकच करी ।। तुझा विसर न पडो अंतरी ।। आता जसे असेल तसे होऊ द्यावे । रघुनाथभजनी असावे ।। मागील झाले होऊन गेले । पुढील येणार येऊ द्यावे भले ।। आत न धरावा हव्यास । हेच वाटे जीवास ।। जे जे करणे आणिले मनी । रामकृपे पावलो जगी । माझे आता काही । दुसरे मागणे नाही।। माझे कोणी नाही । मी कोणाचा नाही । जग आणि देह अगदी माझे नाही ।। जे जे काही दृश्य पहावे। त्याचे रूपांतरच व्हावे । हा नेहमीचा अनुभव ठेविता चित्ती । समाधानाची होय प्राप्ती ।।

जोवर श्वासोच्छ्वास देही । तोवर मुखी नाम पाही ।।

***

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## आनंदाचा आंतरराष्ट्रीय दिवस

ज्योतिर्मय साहित्य

आज २० मार्च, आनंदाचा आंतरराष्ट्रीय दिवस ! २००६ ते २०१२ या काळात संयुक्त राष्ट्रांनी एक मोहीम चालवली. २०११ मध्ये या दिवसाची कल्पना मांडली. आणि २०१३ मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्यात आला. याचे महत्व सर्वांपर्यंत पोहोचावे म्हणून विविध प्रकारचे प्रयत्न करण्यात आले. यात लोकांना आनंदाचे महत्व पटवणे. आपले काम करताना आपण आनंदी असलो तर त्याचे होणारे फायदे प्रत्यक्ष दाखवले गेले. त्याच प्रमाणे विविध वेळी, विविध ठिकाणी आपण आनंदी मनोवृत्ती ठेवली तर कोणते फायदे होतात ते सांगितले गेले. त्या साठी कोणत्या कृती कराव्यात हेही सांगितले गेले. मानवी विकासासाठी आनंद किती महत्त्वाचा असतो याचेही महत्व विषद करण्यात आले.

हे सगळे करण्याची आवश्यकता का वाटली असेल? याचा विचार केला तर काही लोकांची मते, किंवा कामाच्या ठिकाणी आनंदी असणे, घरात आनंदी असणे याचा फारसा स्वीकार केला गेला नव्हता. जे आनंदी दिसत असत त्यांना नावे ठेवली जायची. आनंदाने किंवा हसऱ्या चेहऱ्याने काम करणाऱ्या व्यक्ती म्हणजे त्यांना कोणतीच गंभीरता नसते, ते कोणतेही काम नीट करू शकणार नाहीत असेही गैरसमज होते. कोणतेही काम गंभीरतेने, तणावपूर्ण केले तरच ते प्रामाणिकपणे व व्यवस्थित होते. असेही गैरसमज होते. प्रत्यक्षात काही निरीक्षणे, अनुभव व काही सर्व्हेक्षण केल्यावर असे लक्षात आले, की आनंदी मनाने काम केले तर ते अधिक चांगले होते. आणि करणाऱ्यालाही त्याचा आनंद मिळतो. आनंदाचा संबंध कल्याण व एकूण जीवनातील समाधानाशी जोडलेला असतो. ज्यांची आनंदाची पातळी जास्त असते त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले असते. त्यांचे सामाजिक संबंध मजबूत असतात. प्रतिकूल परिस्थितीला ते तोंड देऊ शकतात.

आनंदाची कोणतीही ढोबळ व्याख्या करता येत नसली तरी त्यात सकारात्मकता ही भावना, उद्देशाची व परिपूर्णतेची भावना अशी मनाची स्थिती दिसून येते. अर्थात प्रत्येकाची आनंदाची व्याख्या व ज्यातून आनंद मिळतो या विषयी दृष्टिकोन भिन्न असतो. आणि वयाच्या प्रत्येक टप्प्यावर हा आनंद बदलत असतो. हा एक वेगळाच विषय आहे.

पण आनंदी राहिल्याने आपल्या कडून समोरच्याला नक्कीच आनंद मिळतो. त्याच्या पर्यंत त्या आनंद लहरी पोहोचतात. खरे तर ही आनंदाची भावना प्रत्येक सजीवात असते. आणि तो व्यक्त करण्याची किंवा ते आनंदी आहेत हे ओळखण्याची पद्धत वेगळी असते. हा आनंद पण असा असतो, तो आपल्याला मिळावा असे वाटत असेल तर तो दुसऱ्यांना द्यावा लागतो. म्हणजे आपला आनंद द्विगुणित होतो. आणि मग आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहिकडे असे होऊन जाते.

आजच्या आनंदाच्या दिवसाच्या उत्सवात आपणही सहभागी होऊ या! स्वतः आनंदी होऊन इतरांनाही आनंदी करु या!



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**परिक्षीणः कश्चित् स्पृहयति यवानां प्रसृतये**
**स पश्चात् सम्पूर्णः कलयति धरित्री तृणसमाम्।**
**अतश्चानैकान्त्याद् गुरुलघुतयाऽर्थेषु धनिना**
**मवस्था वस्तूनि प्रथयति च संकोचयति च ।।**

अर्थ – कोणी निर्धन व्यक्ती ओंजळभर यवधान्याची अभिलाषा करतो. पण संपन्नता प्राप्त झाल्यावर त्याला पृथ्वी देखील तृणवत् वाटते. त्यामुळे धनाविषयी धनिकांची अवस्था अनिश्चित असते. पण त्यांच्या अवस्थेनुरूप पदार्थ मात्र लघुता किंवा महत्तेला प्राप्त होत असतात.

धनाचे महत्व हे सार्वकालिक आहे, तसेच ते सापेक्ष असते. माणसाला कधी एक रुपया हजार रुपयांसारखा वाटतो; तर कधी हजार रुपये एक रुपयासारखे वाटतात. त्यामुळे धनाच्या बाबतीतील व्यक्तीची अवस्थाच महत्वाची असते.




## युरीक असिड च्या त्रासातून मुक्त होण्यासाठी घरगुती उपाय

ज्योतिर्मय साहित्य

पूर्वी ५० – ६० वयाच्या लोकांमध्ये यूरीक ॲसिडची समस्या पाहिली जात होती, तर आजकालच्या चुकीच्या जीवनशैलीमुळे तरुणही यामुळे पीडित आहेत. तणाव, अल्कोहोल–सेवन, शारीरिक हालचालींचा अभाव, व्यायमाचा अभाव, पाणी कमी पिणे आणि चुकीचे खानपान यामुळे यूरीक ॲसिड वाढते व त्याचा त्रास होतो.

यूरीक ॲसिड म्हणजे काय ?

कार्बन, हायड्रोजन, ऑक्सिजन आणि नायट्रोजन यांचे मिश्रण करून कंपाऊंड तयार होते, जे अमीनो ॲसिडच्या रूपात शरीराला प्रोटीनमधून प्राप्त होते त्याला युरीक ॲसिड म्हणतात.

त्यामुळे यूरीक ॲसिड वेळेवर नियंत्रित न केल्यास त्यामुळे गठीया () आणि संधिवात देखील होऊ शकतो. अशा परिस्थितीत काही होम टिप्स आहेत, जेणेकरून तुम्ही त्यावर नियंत्रण ठेवू शकता.

भरपूर लिक्विड आहार घ्या

यूरीक ॲसिड नियंत्रित ठेवण्यासाठी भरपूर पाणी पिणे महत्वाचे आहे. आहारात फळांचा रस, नारळपाणी आण ग्रीन टी सारख्या द्रवपदार्थाचे सेवन करत रहा.

सर्व रंगांच्या भाज्या

प्रत्येक रंगाची भाजी आपल्या आहाराचा एक भाग बनवा. आपल्याला हिरव्या, लाल, केशरी रंगाच्या भाज्यांमधून सर्व पोषकद्रव्ये मिळतील, जे केवळ ॲसिडवर नियंत्रण ठेवत नाहीत तर इतर समस्या देखील टाळतील. (युरीक ॲसिड नियंत्रणात येईपर्यंत फक्त पालकची भाजी टाळावी.)

सिट्रस फ्रूट (सायट्रिक ॲसिडयुक्त फळे)

सिट्रस फ्रूट युरीक ॲसिड क्रिस्टल्सला वितळवून यूरीक ॲसिड पातळी कमी करतात. असे फ्रूट आहारात जरूर घ्या, परंतु मर्यादित प्रमाणात.

छोटी वेलची

पाण्यात मिसळून छोटी वेलची खाल्ल्याने यूरीक ॲसिडचे प्रमाण कमी होईल आणि कोलेस्टेरॉलची पातळीही कमी होईल

बेकिंग सोडा – १ ग्लास पाण्यात १/२ चमचा बेकिंग सोडा मिसळून पिल्यास युरीक ॲसिड नियंत्रणात येण्यास मदत होते.

ओवा– ओवा यूरीक ॲसिडसह शरीरातील सूज कमी करते. यूरिक ॲसिड नियंत्रित करण्यासाठी, एका दिवसात २–३ चमचे ओवा खावा.

दररोज सफरचंद खा

सफरचंद मध्ये उपस्थित ॲसिड यूरिक ॲसिडला न्यूट्रीलाईज करते.

लिंबाचा रस–लिंबू यूरीक ॲसिडला नियंत्रित करते. सकाळी रिकाम्या पोटी लिंबूचा रस पिल्याने आपला फायदा होईल. तसेच दिवसातून किमान चार–पाच वेळा लिंबू–पाणी प्या.

चेरी

चेरी आणि डार्क चेरीमध्ये फ्लेव्होनॉइड्स नावाचे घटक असतात, जे यूरीक ॲसिड कमी करण्यास मदत करतात. सूज आणि कडकपणा दूर ठेवते.

योग देखील फायदेशीर– दररोज व्यायाम करा आणि निरोगी राहा. वजन नियंत्रित ठेवा. असे म्हणतात की फॅटी टिश्यूमुळे यूरीक ॲसिड उत्पादन देखील वाढते.

डाळ शिजवताना काळजी घ्या डाळ शिजवत असतांना सुरुवातीला जो वर फेस येतो तो काढून टाका (त्याच्या सेवनाने युरीक ॲसिड वाढते.) त्यानंतर डाळ पूर्णपणे शिजू द्या.

या गोष्टी टाळा

मद्य आणि बिअर मध्ये यीस्ट मोठ्या प्रमाणात असते म्हणून ते टाळावे. दही, राजमा, चणे, अरबी, तांदूळ, मैदा, लोणचे, कोरडे फळे, मसूर, पालक, फास्ट फूड, कोल्ड ड्रिंक्स, पॅक फूड, मांस, मासे, पेस्ट्री, केक्स, पॅनकेक्स, मलई बिस्किटे, तळलेल्या अन्नापासून दूर रहा.

रात्री या गोष्टी खाऊ नयेत प्रोटीनयुक्त आहार युरीक ॲसिड नियंत्रणात येईपर्यंत कमी खा, शक्यतो टाळा. झोपेच्या वेळी दूध किंवा डाळ घेऊ नका. तरी तुम्हाल डाळ घेण्याची इच्छा असल्यास साल असलेली डाळ तीही थोडी खावा. तसेच, जेवण करताना पाणी पिऊ नका. अन्न खाण्यापूर्वी आर्धा–पाऊण तास आणि नंतर तास–दिड तासाने पाणी प्यावे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## आचरणात आणावे असे



ज्योतिर्मय साहित्य


श्रीरामांनी लक्ष्मणावर ठेवाला होता , राजमाता जिजाऊ मां साहेबांनी शिवरायांवर ठेवला होता छत्रपती शिवरायांनी तानाजी मालुसरेंवर ठेवला होता , छत्रपती शंभुराजेंनी कवी कलशावर ठेवला होता , भारतीय जनतेने स्वातंत्र्य योध्यांवर ठेवला होता , शामच्या आईने शामवर (साने गुरुजी ) ठेवला होता , म्हणूनच विश्वास हा अमुल्य आहे कोणत्याही परिस्थितीत तो कवडीमोल होणार नाही , याची काळजी घेतली पाहिजे


काळजी घे हा शब्द काळजातून निघतो.
''आपल्या'' ''परक्याची'' जाण करून देतो.
कोणीतरी आहे आपल्यासाठी ''झुरणारं''.......
कोणी तरी आहे आपल्यासाठी ''रडणारं''.........
या भावनांनी जीव ''सुखावतो''...
काळजी घे या शब्दातच
''आपलेपणा'' दरवळतो....!!

म्हणून मन नेहमी मोकळेच ठेवा जी गोष्ट मनात आहे ती बोलण्याची हिम्मत ठेवा आणि जी गोष्ट दुसर्याच्या मनात आहे ती समजुन घेण्याची क्षमता ठेवा म्हणजे मन नेहमी आनंदी राहील*

जसे बाहेरील हवामान कितीही चांगल असल तरी , माणसाच्या मनातील आणि घरातील वातावरण चांगल असल तरच , मन प्रसन्न राहील

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

वंदे मातरम  ला राष्ट्रगीताचा मान मिळायला हवा होता, हे मान्य केले तरी जन-गण-मन बाबत गैरसमज पसरवून आपण एका अत्यंत अप्रतिम राष्ट्रभक्तीपर साहित्यकृतीचा आणि रवींद्रनाथांसारख्या महाकवीचा अवमान करीत आहोत याचे भान आपण राखायला हवे.

गेल्या काही भागांपासून रवींद्रनाथांच्या काव्यसृष्टीचाआढावा घेण्याचा प्रयत्न आपण करतो आहोत. हा आढावा म्हणजे टागोरांच्या काव्यसृष्टीला केलेला केवळ स्पर्श आहे याची मला जाणीव आहे. एखाद्या मोठया प्रासादात विविध दालने असावीत आणि त्यातील काही दालनेच पाहता यावीत, त्यानेच डोळे दिपून जावेत तसे माझे झाले आहेत. त्याची काव्यसृष्टी म्हणजे सागर आहे. कितीही वेळा खोल बुडी मारली तरी प्रत्येक वेळी मौल्यवान रत्ने, मोती हाताला लागतील.

टागोरांनी जवळपास दोन अडीच हजार कविता लिहिल्या. नुसत्या कविताच लिहिल्या असं नाही तर त्यातील बऱ्याच कवितांना चाली दिल्या. रवींद्रनाथ थोर साहित्यिक असले तरीही त्यांचा जीव जडला होता तो कविता या साहित्यप्रकारावर. कवितेशी त्यांचं नातं अतूट होतं, आजन्म होतं. आपल्या पुतणीला लिहिलेल्या एका पत्रात ते आपलं आणि कवितेचं नातं स्पष्ट करतात.

कविता ही माझी पूर्वीपासूनची प्रेयसी. मला वाटतं मी रथीच्या ( रवींद्रनाथाचा मुलगा रथींद्रनाथ ) वयाचा होतो तेव्हाच तिच्याशी माझा वाङ्निश्चय झाला. तेव्हापासून आमच्या पुष्करणीचा काठ, वडाचा पार, बंगल्यातला बगीचा, मोलकरणीच्या तोंडून ऐकलेल्या कहाण्या, गाणी हे सारं माझ्या मनात एक प्रकारची जादूची सृष्टी उभी करीत असे. त्या वेळची माझ्या मनाची धूसर पण अपूर्व अशी अवस्था समजून सांगणं अवघड आहे. एक मात्र मी नक्की सांगू शकेन - की त्या काळी माझं कवितेबरोबरच शुभमंगल झालं होतं. पण ह्या पोरीची लक्षणं धड नाहीत हे मात्र मान्य केलंच पाहिजे. बाकीचं जाऊ दे, पण मोठंसं भाग्यही घेऊन आली नाही ती. सुख दिलं नाही असं नाही मी म्हणणार पण स्वास्थ्य देण्याचं नाव नको. ज्याला वरते त्याला भरपूर आनंद देते, पण कधी कधी तिच्या त्या घट्ट मिठीतुन हृदपिंडातलं रक्त बाहेर काढते. एकदा तिनं एखाद्याची निवड केली की घरदार सांभाळीत स्वस्थ बसेन म्हणण्याची सोय नाही. तरीसुद्धा माझं जीवन तिच्याशीच निगडित आहे.  साधने त लिहितो, जमीनदारीही सांभाळतो. पण ज्या क्षणी कविता लिहायला बसतो, त्या क्षणी मात्र माझं चिरंतन अस्तित्व माझ्यामध्ये प्रवेश करीत असतं. हे माझं स्थान मी चांगलं ओळखतो. जीवनात माझ्या हातून कळत नकळत खोटं आचरण घडलं असेल पण कवितेशी मात्र कधीच खोटेपणा करून चालत नाही. माझ्या जीवनातल्या सखोल सत्याचं हे आश्रयस्थान.

स्वातंत्र्याचा स्वर्ग  ही त्यांची कविता मला फार आवडते. या कवितेत परमेश्वराकडे जी मागणी रवींद्रनाथांनी केली आहे, तिची कधी नव्हे तेवढी आवश्यकता आजच्या घडीला आहे. ही कविता म्हणजे रवींद्रनाथांनी देशाच्या संदर्भात पाहिलेले सुंदर स्वप्नच आहे. संत ज्ञानेश्वरांनी जे पसायदान विश्वात्मक देवाकडे मागितले, तशाच प्रकारची मागणी रवींद्रनाथ या कवितेत परमेश्वराकडे करताना दिसतात. आपल्या देश नुसता स्वतंत्र व्हावा असं ते म्हणत नाहीत, तर तो  स्वातंत्र्याचा स्वर्ग व्हावा अशी त्यांची इच्छा आहे.

# रंगभूमी सामाजिक परिवर्तनाची रणभूमी व्हावी-डॉ.नारायणराव मुंडे

**ज्योतिर्मय साहित्य**

**जालना** - रंगभूमी ही केवळ मनोरंजनासाठी नाही तर रंगभूमीवरून सामाजिक परिवर्तनाचे विचार मांडले पाहिजेत. रंगभूमी ही नवविचारांच्या प्रस्थापनेची रणभूमी झाली पाहिजे असे प्रतिपादन माजी आमदार नारायणराव मुंडे यांनी केले.  राज्य शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीने आयोजित दहा दिवसीय नाट्य प्रशिक्षण शिबिराचे राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात उद्घाटन झाले. या वेळी ते बोलत होते.

या वेळी ज्येष्ठ रंगकर्मी सुंदर कुंवरपुरिया, कॉम्रेड अण्णा सावंत, प्राचार्या सुनंदा तिडके, नाट्यलेखक डॉ.



सतीश साळुंके, प्रा. तन्मय शेटगार आदींची प्रमुख उपस्थिती होती. मुंडे पुढे म्हणाले की, विकासाचा अर्थ हा भौतिक विकास नसतो तर जीवनाचा सांस्कृतिक विकास हाच माणसाला शांततेकडे आणि संपन्न जीवनाकडे घेऊन जाणार असतो. या वेळी सुंदर कुंवरपुरिया म्हणाले की, आपण बालपणापासून नाट्यक्षेत्रात आहोत. त्यामुळे वेगळ्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या शिबिराची आवश्यकता कधीही भासली नाही. हौशी रंगभूमीमुळेच खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमी टिकवून ठेवली असून हौशी रंगभूमीला प्रेक्षकांची साथ हवी. जालना हे कलावंतांचे माहेरघर आहे असे प्रतिपादनही त्यांनी केले.

नाटक हे एक असे माध्यम आहे जे तुमच्या सर्व समस्यांवर मात करून तुम्हाला आनंदी जीवन जगायला शिकवते बालपणात आणि महाविद्यालयात शिक्षकांनी जे संस्कार केले त्यामुळेच आपल्या जीवनामध्ये नाट्य आले आणि ते शेवटी जगण्याचा श्वास झाले. प्रास्ताविक डॉ. सतीश साळुंके यांनी केले.

त्यांनी शिबिराची रूपरेषा विषद करून नाटक आणि व्यक्तिमत्त्व आणि मराठवाड्यातील नाट्यपरंपरेवर तसेच जालन्याच्या नाट्यपरंपरेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिबिर संचालक प्रा. तन्मय शेटगार यांनी केले. या वेळी सर्व शिबिरार्थी, जालन्यातील ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. बसवराज कोरे, सुमीत शर्मा, सतीश लिंगडे, विनोद जैतमहाल, सचिन निर्मळ, मिलिंद दुसे व शिबिरार्थी उपस्थित होते.

# करूया जलसंधारण

**ज्योतिर्मय साहित्य**

विश्वनाटय सूत्रधार तूच श्याम सुंदरा।
चातुरी तुझी अगाध कमलनयन श्रीधरा ।

शाळेची प्रार्थना झाली सर्व विद्यार्थी रांगेत आपल्या वर्गात पोहचले घंटा होऊन तास सुरू झाले शाळेचा चपराशी वर्गात सूचना घेऊन पोहचला आपल्या प्रशालेत २२ मार्च हा जागतिक जलदिन साजरा होणार आहे. त्यासाठी पाण्याची बचत, पाणी याविषयावर कविता, गोष्टी, नाटिका, भित्तीपत्रके याता सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. मग काय सगळीकडे एकच गडबड सुरू झाली. विज्ञानाच्या बाईचा तास चालू होता मी बाईना विचारले, ''बाई, हा कोणता कार्यक्रम आहे?'' आम्ही या कार्यक्रमात कसे सहभागी व्हायचे ?'' बाईनी स्मितहास्य केले,थांबा ह ...मी सांगते तुम्हांला समजावून हजेरी घेऊन त्यांनी बाजूला ठेवली. मुलांनो, पाणी हे जीवन आहे

**वाचवील पाणी साठवील पाणी त्यालाच फक्त जगवील पाणी.?**

सदयस्थितीत वर्तमानपत्र वाचता ना ! आज वर्तमानपत्र उघडले की, सर्वत्र दुष्काळाच्या बातम्या आपल्याला दिसतात. मुलांनी माना डोलावल्या आणि बाईचे बोलणे मन लावून ऐकू लागली. बाईनी आज महाराष्ट्रात निर्माण झालेली पाणीटंचाईचे संकट समोर ठेवले या टंचाईवर मात करण्यासाठी आपण पाण्याच पुनर्चक्रीकरण करणं पाण्याचा अपव्यय टाळणं या गोष्टी सर्वांना समजण्यासाठी पावसाच पाणी साठवलं आणि जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरवल तर देशातला पाणीप्रश्न सुद्धा सुटू शकतो यासाठी आतापासून आपण प्रयत्न करण्याची गरज आहे असे स्पष्ट केले घंटा झाली आणि तास केव्हा संपला ते कळालेच नाही बाई म्हणाल्या चला कार्यक्रमाच्या तयारीला लागा असे सांगून वर्गाबाहेर पडल्या.

२२ मार्च साठी सर्वांनी भित्तीपत्रके, पाणी वाचविण्याचे संदेश देणारे चित्र, गाणी, कविता यांचे सादरीकरण करण्याचे नियोजन केले. तेवढ्यात मराठीच्या बाई वर्गात येऊन दोन मिनिटे झाली पण गोंगाट बघून त्या रागावल्या मुलांनो ! काय झालं तसा वर्गशांत झाला. समोरचा मुलगा



म्हटला बाई जलदिन कार्यक्रमाची चर्चा चाललेली आहे हं.. असे करून त्यांनी सर्वांवर नजर टाकली.

वृक्ष नष्ट झाले तर.
कोसळणार नाही मुसळधार पाऊस.
आटून जाईल निर्झराची खळखळ
हरवून जाईन सुंदर कुसुमांचा परिमल.
असहय होईल जगणे अन्नपाण्याविना...

विश्वास पाटील यांच्या सहावीच्या पाणी या पाठाचा उल्लेख करत बाईनी आता संक्रातीलाच म्हणजे जानेवारीतच पाणी आटू लागले दोन-तीन सालांत कशी नदीची शोभा गेली गावंदरीच्या विहिरी जवळ भांडणतंटा कसे घडे फुटायचे पांगिरकरांचा पाण्याचा हिशोब मांडून बाईनी आपले बोलणे थांबवले.

२२ मार्चचा दिवस उजाडला महाराष्ट्र जलसंपदा विभाग, कार्यालयातील अधिकारी



सौ शुभांगी हेमंत पांगरकर,
छत्रपती संभाजीनगर

यांच्या समोर विद्यार्थ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर, घोषवाक्य, पाण्याची गाणी यांचे सादरीकरण केले. विजय सर जेव्हा बोलण्यास उभे राहिले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. बाळांनो, खूप छान अशी सुरुवात त्यांनी करून सर्वांना जिंकूनच घेतले. आज सर्वत्र गाजावाजा आहे तो फक्त   चा पण ही परिस्थिती आपणच निर्माण केली पेट्रोलपंपाप्रमाणे पाण्याचे मशिन किंवा रेशनकार्डवर पाणी मिळेल असे भविष्यात होऊ शकते पण तुमच्या सारखी समंजस पिढी समोर असेल तर हे टाळणे शक्य आहे.

पृथ्वीवरील केवळ ३% पाणी पिण्यायोग्य गोड असून ते नदया, विहिरी, तलाव, हिमनग, बर्फ या अवस्थेत असते गोड पाणी पृष्ठभागावर तसेच तळभागातही आढळते. पाण्याचा एकमेव स्त्रोत म्हणजे पर्जन्य चार महिन्यांच्या पावसाळा ऋतुत पडणाऱ्या पावसाचे पाणी जलाशयांमध्ये साठविले जाते.दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असून इंधन व इतर अनेक गोष्टींसाठी झाडांची कत्तल होत आहे वृक्षतोडी मुळे पर्जन्य प्रमाण कमी झाले आहे. दोन-तीन वर्ष पाऊस पडलाच नाही तर त्याकरिता पाण्याचे योग्य व्यवस्थापन करून पावसाचे पाणी जमिनीत मुरवायचे, पाण्याचे पुनर्भरण, पाण्याचे ऑडिटच सरांनी स्लाईड शो द्वारे मांडले सर्व विदयार्थ्यांना चांगला संदेश मिळाला. उन्हाळ्यात तर चार दिवसाआड मिळणारे नळाचे पाणी सुद्धा कठीण झाले तर.. लातूरला तर सांगलीहून आगगाडीने पाणी पाठवले गेले हा एका गावाचा प्रश्न होता म्हणून शक्य झाले पण गावोगावी झाले असते तर आपण काय केले असते या गोष्टीचा विचार करून पंतप्रधान योजनेअंतर्गत पाच जूनला. वृक्षारोपण मोहिम हाती घेण्यात आली प्रत्येकाने एक झाड अशी संकल्पना घेत शाळेतून मुलांनी वृक्षारोपण केले.

''झाडेच झाडे लावूया पाऊसच पाऊस बोलवूया,
इकडे झाडे तिकडे झाडे पाऊस पडे सगळीकडे'' जलयुक्त शिवार, पाणी अडवा, पाणी जिरवा

पाण्याचे पुनर्भरण अशा अनेक योजना सरकार राबवत आहे, शाळांमधून, सरकारी कार्यालये, संघटना यांनी पाण्याचे पुनर्भरण याचा प्रसार करण्याचे कर्तव्य करावे, छोटासा इस्त्राइल देश पाण्याच्या व्यवस्थापानाने जगात ओळखला जातो. आपण प्रत्येकाने पाण्याचा थेंब न थेंब वाचविला तर, आपलाही विकास, प्रगतीपथावर असेल. गावागावांमध्ये शहरांमध्ये पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यात रेनवॉटर हार्वेस्टिंग करून छपरावरील गच्चीवरील सर्व पाणी, शेतात चरे, तलाव याद्वारे पाणी साचविले तर पुन्हा भारत सुजलाम सुफलाम होण्यास वेळ लागणार नाही आणि मग सर्वजण आनंदी, उत्साही असतील.

आनंदी आनंदी गडे, जिकडे तिकडे चोहीकडे।
असेच वातावरण असेल या देशात सगळीकडे.
चला तर मग लागू या कामाला, करूया जवळ जलसंधारणाला.

***

# संवेदनशील बालमनावर उत्तम संस्कार करणाऱ्या कथा : पॅडीची गोष्ट


**ज्योतिर्मय साहित्य**

.. वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील मुलांवर जर चांगले संस्कार रूजवले तर पुढच्या शंभर वर्षापर्यंत ते चिरकाल टिकणारे असतात ,असे म्हणतात.जसे वाईट संस्कार माणसाला बिघडवल्याशिवाय राहत नाहीत तसेच चांगले संस्कार माणसाला बिघडू देत नाहीत ; म्हणून योग्य वयात चांगले संस्कार रुजणे फार महत्त्वाचे असते.अगदी एखाद्या कुंभाराप्रमाणे कच्च्या मातीच्या गोळ्यापासून कुंभार पक्की मडकी बनवतो,तसेच बालकांच्या कोवळ्या मनाच्या पाटीवर जे कोरले जाते, ते चिरकाल टिकणारे असते.राजमाता जिजाऊ माँसाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर बालवयातच स्त्रियांचा सन्मान करायला लावणारे संस्कार पेरले होते म्हणून अख्या जगात शत्रूच्या स्त्रीलाही आदराने वागवणारे छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजे ठरले होते.म्हणून संस्कार हे योग्य वयातच करावे लागतात ... अशाच संस्कारांची मुलांवर पखरण करणारा बालकथासंग्रह बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध लेखक  उमेश मोहिते यांचा नुकताच प्रकाशित झाला आहे. हा कथासंग्रह म्हणजे पॅडीची गोष्ट होय.या कथासंग्रहातील सर्वच कथा बालकांवर चांगल्या संस्कारांचे रोपण करुन वाचकाला बालकांच्या भावविश्वात घेऊन जातात. जणू त्या कथेत मी स्वतःच आहे की काय असे चित्र वाचकाच्या डोळ्यांसमोर उभे राहते आणि प्रत्येक कथा लहान मुलांना अगदी आपलीच आहे अशी वाटू लागते.ही शब्दांची जादू उमेश मोहिते सर यांच्या लेखणीत आहे.

प्रॉमिस या कथेत खूप अभ्यास करून आपल्या वर्गाचे नांव करण्याची हुशार बाळूची धडपड खरंच वाखाणण्याजोगी आहे.ही कथा प्रत्येक विद्यार्थ्याला अभ्यास करण्याचा संदेश देते आणि मित्रप्रेमाचाही बोध देते. येस फ्रेंड ही बालकथा बालकांच्या काळजाला भिडणारी आहे. वर्गातला सरांचा मार चुकवण्यासाठी मन्याने वर्गात खोटं बोललेलं अन्याला सहन होत नाही आणि खोटे बोलणे हे पाप असते, असं म्हणत तो मन्याची चूक त्याच्या आईला सांगून त्याला धडा देतो, अशा आशयाची ही कथा कौतुकास्पदच आहे. मन्याला चांगली सवय लागावी या हेतूने त्याला सुधारू पाहणाराअन्या मुलांना भावल्याशिवाय राहत नाही. गौरव कथेमधल्या गौरवचे अक्षर किती सुंदर आहे? म्हणून खेडेगावातून आलेल्या गौरवच सरांनी केलेलं कौतुक गौरवच्या आयुष्याला आकार देणारं आहे. भाषा हे बोलण्याचा माध्यम असले तरी खेडेगावातून आलेल्या गौरवला गृहपाठ न केल्याबद्दल सरांनी उठवलं खरं पण गौरवच्या सुंदर अक्षरापुढे अवाक् झालेले मराठी विषयाचे काळे सर गौरवचे मनापासून अभिनंदन करतात. गुरु शिष्याचं खरं नातं कसं असावं नि विद्यार्थी कसा असावा ? त्याचे अक्षर कसं असावं, इ.बाबींचा उलगडा करणारी ही कथा आहे. सुंदर अक्षर हाच सोन्याचा दागिना आहे  ही ओळ बालमनावर संस्कार करून जाते.


गणित येत नाही म्हणून घाबरलेल्या रम्याला केवळ संकटात मदत करणाराच खरा मित्र. या सरांच्या एका ओळीचा पडलेला प्रभाव अमितवर दिसून येतो. त्यामुळे अमित रम्याशी मैत्री करतो. संकट काळात मदतीला धावून येतो तोच खरा मित्र. हा सुविचार या कथेमध्ये दिसून येतो.अमित वर झालेले योग्य संस्कार गणेश सारख्या मुलाने किती दिवस त्रास दिल्या तरी चांगले संस्कार सुटत नाहीत चांगल्या विचारांनी माणूस चांगलाच होतो हे शिकवण मित्र या कथेतून विद्यार्थ्यांना मिळते.

एक मार्काचं आपण राधाला विचारून लिहून आपणाला २९ मार्क पडले म्हणून त्याचं बक्षीस घेताना हुंदका देत रडणारी सुरेखा सरांना खरं काय ते सांगते. त्यातून खोटं बोलणं हे पापच पण खोटं बोललेलंही सर्वांसमोर सांगून मोठ्या मनाचे सुरेखा




प्रामाणिकपणे सरांना बक्षीस परत करण्याचा प्रयत्न करते त्यावर सुद्धा सरांनी तिच्या प्रामाणिकपणाचे केलेलं कौतुक बालकांना प्रामाणिकपणाचे संस्कार पेरून जाते आणि लहान मुलांना विचार करायला लावणारी ही कथा आहे. वास्तव जाणून न घेता माने सरांनी सुन्याला केलेली शिक्षा सरांच्याही काळजाचा ठोका सत्य ऐकल्यावर चुकल्यासारखा वाटतो. कधी कधी जे दिसतं तसं नसतं मनानं सुन्याला मार बसावा म्हणून जाणीवपूर्वक मन्याने दप्तरात ठेवलेली वही बालवयातला वर्गातला खोडसाळपणा दाखवतो. केवळ बघ्याची भूमिका न करता सत्य सांगणारे रवी आणि दिनू यांनी सरांना सांगितलेले सत्य सुद्धा सांगण्यासाठी धाडसच लागतं हा संस्कार फार महत्त्वाचा आहे. नाजूक परिस्थिती असणारा प्रत्येक जण चोरच असतो असे नाही. रक्ताच्या नात्यापेक्षा कधी कधी मानलेले नाते किती श्रेष्ठ असतात.पेपर टाकणारा पेपरवाला खुशीचा जीव वाचवतो तेंव्हा सख्खा भाऊ नसल्याचे दुःख विसरून राखी पेपरवाल्या भैयालाच आपला भाऊ मानते. त्याने राखीचा जीव वाचवला होता. अशा बहिण भावाच्या निष्पाप प्रेमाची कथा बालमनावर नक्कीच संस्कार पेरणारी आहे.

एका वडील नसलेल्या बबनच्या घरची परिस्थिती खूपच नाजूक असते पण तो अभ्यासात खूपच हुशार असतो.पण त्याच्याकडे गणवेश घ्यायला पैसे नव्हते



पुस्तक परीक्षण

मीनाक्षी पांडुरंग नागराळे,
मो.९७६७६६३२५७

तेंव्हा पॅडी नावाचा त्याचा मित्र आपल्या या गरीब मित्राला त्याच्या खाऊच्या जमा केलेल्या पैशातून नवीन ड्रेस घेऊन देतो आणि मैत्रीला जागतो ; अशा आशयाची पॅडीची गोष्ट ही कथा बालमनावर एकमेकांना मदत करायचा संस्कार देते .

या सर्वच कथा वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या आहेत. कितीही गरीबी असली तरीही रघु यशवंतकडे स्वतः दूध तालुक्याच्या ठिकाणी घालायला सायकलवर घेऊन जातो. रघुची सायकल घेण्यासाठी चाललेली धडपड ही खरी कमाई या कथेतून दिसून येते.खरंच खरी कमाई ही कथा आणि त्यावर रघूचे प्रामाणिक कष्ट वाखाण्याजोगी आहे. प्रामाणिक रघुचा संघर्ष खरी कमाई या कथेतून दिसून येतो. बाळू आणि गजाच भांडण कायमचं मिटवण्यासाठी राखीने केलेली राखीची आयडिया कौतुकास्पदच आहे. मुलांनी आपापसात भांडू नये हे राखी या कथेतून दिसून येते. नेहमी शाळा बुडवणारा पम्या अभ्यासात जरी कच्चा असला तरी एलिमेंट्रीच्या परीक्षेत मात्र तालुक्यातून पहिला नंबर मिळवतो. यावरून अभ्यास न करणाऱ्या मुलांना ही कथा खूप प्रेरणादायी आहे. शाळेविषयी आवड निर्माण करणारी आहे.भेट,शाबास रघु आणि सई या कथासुद्धा खूप चांगल्या संस्कार घडवणाऱ्या व शाळेविषयी अस्मिता बाळगणाऱ्या संस्कारक्षम कथा आहेत.

लेखक उमेश मोहिते यांच्या  पॅडीची गोष्ट  या संग्रहातील सर्वच कथा लहान मुलांवर चांगले संस्कार घडवणाऱ्या तर आहेतच पण बालकांना नक्कीच प्रेरणा देऊन जाणा-या आहेत. सानथोरानी सर्वांनीच वाचावा असा उत्कृष्ट बालकथासंग्रह सर्वच शाळेमध्ये निश्चितच असायला हवा. उमेश मोहिते सरांची साधी सरळ सोपी भाषा बालमित्रांच्या अंतकरणाला भिडणारी आहे.प्रत्येक शिक्षक, पालक आणि बालक यांनी आवर्जून वाचावा असाच हा कथासंग्रह आहे, हे नक्की ! पुढील वाटचालीसाठी उमेश मोहिते यांना खूप खूप शुभेच्छा !

पॅडीची गोष्ट : ( बालकथा )
लेखक :  उमेश मोहिते
प्रकाशक : इसाप प्रकाशन,नांदेड ,
(मो.७६६६१८६९२८)
पृष्ठ -  ६४     मूल्य  : १२०

# समग्र स्त्रीजातीचे प्रातिनिधीक समाजभान असणारी कवयित्री-संगीता वाणी

**ज्योतिर्मय साहित्य**

स्त्री; ती आहे कुणाची जिवलग सखी, कुणाची माय, कुणाची साय ! ती अतिसंवेदनशील. संवेदनशील वेगळं अन् अतिसंवेदनशील असणं वेगळं.वेदना जाणावयाला संवेदना जागविणारी ती आहे, विद्युल्लता.संगीता वाणी या कवयित्रीचा एकुणच प्रभाव आणि प्रभव त्यांच्या कवितेत उतरतो. शैलीशास्त्रीय समीक्षक म्हणतात की, ‘‘As the man is,so is his style‘‘ म्हणजे जसा कवी तशी त्याची शैली.संगीता वाणी यांच्या कवितेत आपल्याला वरवर आत्मनिवेदन वाटंत असेल तरी ही कवयित्री आपल्या मूळ वेदना जगजाहीर करुन त्यांचा बाजार मांडत नाही.ही कवयित्री व्यक्त होताना सुध्दा त्यात मी ऐवजी आम्हीचा आविष्कार असतो.व्यष्टी ऐवजी ते समष्टीचे प्रतिबिंब असते. वरवर पाहता त्यांची कविता ही बहिर्मुख आहे की काय? असा प्रश्न पडतो, तेव्हा त्या शब्दांच्या गाभार्यात एखादा समीक्षक प्रवेश करतो तेव्हा त्याला ती कविता प्रासंगिक वा तत्कालिक वाटंत नाही.त्यातील स्त्रीमनाचा जो आविष्कार प्रतित होतो, तो एककालीक नसुन सार्वकालिक असतो.एकाच वेळा त्या लोपामुद्राच्या भूमिकेतून तर दुसरीकडे स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे या कुलीन स्त्रीच्या भूमिकेतून व्यक्त होतात.

उदा.एका कवितेत त्या म्हणतात की,

प्रत्येक स्त्री एक प्रवाह आहे..

आपण लोपामुद्राचे चरित्र पाहिले तर त्यातील लोककथा अशी सांगते की, लोपामुद्रेने कावेरी नदीचे रुप धारण केले व दक्षिणेत जो प्रदेश दुष्काळामुळे वाळवंट झाला होता, त्या प्रदेशातून कावेरीचा प्रवाह गेल्याने ती जमीन, तो भूभाग सुजलाम सुफलाम झाला.कथा बाजूला ठेऊन विचार केला तर स्त्री आणि पुरुष यांच्या नात्यात स्त्रीचे स्थान एखाद्या जीवनदायिनीसारखे आहे.ती असते म्हणुन घरात चैतन्य असते. म्हणुन तर फ.मु.शिंदेंसारखा कवी तिला जन्माची शिदोरी संबोधतो.ती सरतही नाही अन् ..... कारण ते घरातल्या घरात गजबलेलं गाव असते.

एक संस्कृत श्लोक असा आहे, ‘‘कुपुत्रो भवती।कुमाता न भवती।।‘‘ कुमाता जन्माला येऊच शकत नाही.स्त्रीला जे ह्रदय निसर्गाने दिलंय, ते गंगेसारखं पवित्र व विशाल दिलंय. राम तेरी गंगा मैली चित्रपटात गीतकाराने जे गीत लिहीलंय त्यात ती नायिका म्हणते, माझा प्रवाह पवित्रच आहे.पण सागराला जाईपर्यंत पापीयोंके पाप धोते धोते ती मैली होते वास्तविक येथील रुढी,परंपरांच्या विळख्यात अडकलेल्या समाजातून जेव्हा ती वाहत जाते तेव्हा ती आपली मर्यादा सोडंत नाही. नितीमत्तेचे व शालिनतेचे, सुशिलतेचे काठ सोडून ती बाहेर पडत नाही.म्हणुन स्त्री एक जीवन प्रवाह आहे,जो परंपरेच्या व रुढींच्या डोंगरदर्यांतून वाहतानाही आपली मर्यादा सोडीत नाही.म्हणून तर कवयित्री म्हणते की,

जीवन म्हणजे एक कोडंच
आहे,
अगणित ह्रदयांना जोडणार,
प्रत्येक क्षणात हास्य
फुलवणार,
अशीच माझी ओळख आहे!

नदी प्रवाहित झाल्यानंतर तिच्या काठचा प्रदेश फळाफुलांनी बहरतो.तसंच स्त्रीचंही आहे. लग्नापूर्वी माहेरी असताना आणि लग्नानंतर सासरी गेल्यावर दोन्हीही कुटुंबात ती आनंदवाहिनी बनते.अगणित ह्रदयांना जोडते तेव्हा ती कुणाची तरीआई, आजी, काकू, मामी, मावशी, आत्या, पणजी, मावशी, लेक असते.या नात्यांनी अगणित ह्रदयांशी ती जोडलीच जात नाही तर प्रत्येक क्षणात हास्य फुलविते.



दत्तात्रय डुंबरे,
छत्रपती संभाजीनगर

आपण चर्चेची सुरवात अशी केली होती की,संगीता वाणींची कविता ही व्यष्टीची नाही,ती समष्टीची आहे.या कवितेत मी पणाचा अहंभाव नाही, आहे तो सर्वसमावेशक सोऽहं भाव.त्यांची शैली ही आत्मविलोपनात्मक शैली आहे.त्यांचे एकटीचे आत्म प्रकटीकरण कवितेतून होत नाही तर समग्र स्त्रीजात या भावाने त्या प्रगट होतात.अतिशय अंतर्मुखतेने ही कवयित्री व्यक्त होते,पण हे व्यक्त होणे सुध्दा नदीच्या भोवर्यासारखे गर्तेत सापडविणारे नाही.ते गंगेच्या संथ प्रवाहासारखे स्थिर व आत्मप्रकटीकरणात्मक आहे. हे आत्मप्रकटीकरणात्मक प्रसवणं किंवा वाहणं त्यांच्याच नव्हे तर समग्र स्त्रीजातीच्या जीवनप्रहाचा आरसा आहे. इंग्रजी कवी मॅथ्यू अर्नोल्ड म्हणतो, लिटरेचर मिरर टू नेचर किंवा लिटरेचर इज द क्रिटीझम ऑफ लाईफ त्याप्रमाणे वाणींची कविता ही समग्र स्त्रीजातीचे प्रातिनिधिक समाजभाष्य ठरते.

अंगीभूत संवेदनशीलतेमुळे त्यांची कविता अत्यंत हळुवार,कलात्मक व नाजूकपणाचे प्रकटीकरण करते.

स्वप्न डोळ्यात सजवून ठेवते...
फुलपाखराप्रमाणे बागडते...

कवयित्रीच्या कवितेचा वरवरचा चेहरा जरी स्वच्छंदी दिसत असला तरी जीवनानुभवाने तिला भविष्याकडे पाहण्याची एक वेगळी नजर दिलीय. चाणक्य म्हणतो,‘‘स्त्री नेहमी भविष्याचा विचार करते म्हणून नवर्याच्या परोक्ष ती काही पुंजी साठवून ठेवते. स्त्रीला भविष्याची स्वप्न पाहण्याची दुर्दम्य ईच्छाशक्ती निसर्गाने दिलीय.म्हणून स्वप्नांचे रुपक योजून कवयित्री स्त्रीजातीचे जे स्त्रीभान आहे ते प्रकट करते. म्हणून तर कवयित्री म्हणते,

दिवसाची सुरवात होते माझ्यापासून...
दिवसाचा शेवटही माझ्यापाशीच होतो...
तर एका दिवसातच मी कशी सामावू?

कवयित्रीने या ठिकाणी अतिशय उच्च दर्जाचे वेदांती तत्वज्ञान वापरलंय.व्यंजनेने या ओळींचा अर्थनिर्णय करावा लागतो.दिवसाची सुरवात माझ्यापासून होते म्हणजे, ज्या पंचतत्वापासून मानवी देह तयार होतो, शेवटी त्यातच त्याचे विसर्जन होते.

मातीत असशी मातीत मिळशी।

नाथांनी कोल्हाटीण नावाचे एक रुपक लिहीले आहे, कदाचित त्याचा प्रभाव कवयित्रीवर पडलेला असावा. मायेच्या पोटी ब्रम्हाची उत्पत्ती होते.अन तिथेच मायेने अच्छादिल्यामुळे लय पावल्यासारखे वाटते.

सगुण गुण माया। आली कोल्हाटीण खेळाया।।
प्रपंचाचा रोवियेला वेळु। चहु शून्यांचा मांडीयेला खेळू।ब्रम्हाविष्णू जयाचे बाळू। लागती पाया।।

कोल्हाटीण म्हणजे माया. तिने हा जन्ममरणरुपी किंवा वासनारुपी प्रपंचाचा वेळु रोवला आहे.मायेच्या पोटीच ब्रम्ह म्हणजे राजस,विष्णू म्हणजे सत्व,शिव म्हणजे तामस गुण प्रगट झाले.म्हणून या त्रिगुणात्मक मायेमुळे हे जग चालले आहे.म्हणून उत्पत्ती, स्थिती आणि लय एकाच ठिकाणी होतो.म्हणून कधी ती महिषासूरमर्दिनी,कधी कालिका,कधी चंडी,कधी दुर्गा, कधी मुक्ता,तर कधी सीता,कधी द्रौपदी तर कधी राधेच्या मीरेच्या,जनाबाईच्या, रुपातही प्रकटते. अशा हा महान विभूतीमत्वासाठी एक दिवस साजरा करुन कसं चालेल? म्हणून संगीता वाणी म्हणतात,

तर एका दिवसात कशी मी सामावू?

***

# पाण्याचे महत्व अनन्य साधारण

आज २२ मार्च, आजचा दिवस जागतिक जल दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही. पाण्याची गरज नाही असे कोणतेच क्षेत्र नाही. पण आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाण्याच्या बचतीसाठी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने १९९२ मध्ये झालेल्या अधिवेशनात २२ मार्च हा दिवस जागतिक जल दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २२ मार्च १९९३ रोजी पहिल्यांदा जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. ब्राझीलची राजधानी रियो डी जिनोरियो येथे पहिला जल दिन साजरा करण्यात आला. पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. २२ मार्च हाच दिवस जागतिक जल दिन म्हणून निवडण्यामागे कारणही तसेच आहे. २२ मार्च पासून वातावरण बदलास सुरवात होते. त्यामुळे तात्विक दृष्ट्या पावसाळ्याची सुरवात होण्यासाठी हा दिवस कारणीभूत ठरतो. हा तर्क वापरुन हा दिवस निवडण्यात आला आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे. वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यास हे पाणी कमी पडत आहे. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज असली तरी इतर सजीव पाण्याच्या अपव्यय करित नाहीत मानव मात्र पाण्याचा मोठा अपव्यय करतो, गरजेपेक्षा जास्त पाणी वापरतो. पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाटयाने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी बोअरवेल घेऊन जमीनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे त्यामुळे भविष्यात पाणी टंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

त्यामुळेच कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होईल असा अहवाल काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्र संघाने दिला आहे. २०२५ पर्यंत जगातील एक तृतीयांश देशात पाणी पेटणार असल्याचे संकेत शास्त्रज्ञांनी दिले आहेत. आशिया खंडाबाबत सांगायचे झाले तर भारतात पाणी टंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरवातीलाच पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो. महाराष्ट्रातील मराठवाडा सारख्या विभागात तर दरवर्षी दुष्काळ असतो. लातूर सारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवठा करावा लागतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणी टंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. एकदा आलेला टँकर आठ दिवसांनीच पुन्हा येतो. काही गावात तर एका महिन्यात एकदाच पाणी मिळते. हंडाभर पाण्यासाठी महिलांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागते. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करूनच आपण पाणी टंचाईवर मात करू शकतो. जल है तो कल है... या उक्तीनुसार येणारा काळ सुखकर करायचा असेल तर पाण्याची बचत करावीच लागेल. आजच्या दिवशी प्रत्येकाने पाणी बचतीचा संकल्प करून पाणी बचतीसाठी प्रयत्न केला तरच जागतिक जल दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

***



## आठवणीतले बालपण

# बालपणीचा काळ सुखाचा

मला जर कोणी विचारले तुझ्या आयुष्यातील सुखाचा काळ कोणता तर मी मनातून सांगेल की माझ्या ‘‘बालपणीचा काळ सुखाचा‘‘ तोही दैठणा (ठाकुर बुवा) येथील वास्तव्याचा.

खरच तसं तर सर्वांच्या आयुष्यातील सोनेरी पर्व म्हणजे आपले बालपण असते.

माझा जन्म परभणीचा त्यावेळी बाबा नानल पेठ येथील गोसावी आजीच्या वाड्यात वास्तव्यास होते. मी अडीच वर्षांचा असताना बाबांची बदली परभणीहून दैठणा सज्जा येथे झाली. बाबा महसूल खात्यात तलाठी या पदावर कार्यरत होते.

दैठणा (ठाकुर बुवा ) हे गाव परभणी -गंगाखेड राज्य रस्त्यावर आहे. येथे सर्व जातीधर्माचे बांधव गुण्यागोविंदाने राहतात.

१९८२ ते १९८६ किमान पाच वर्षांचा माझा बालपणीचा काळ म्हणजे एक सोनेरी पानच होते.

दैठणा येथील बालपणीच्या असंख्य आठवणी माझ्या ह्रदयातील एका कप्प्यात मी जपून ठेवल्या आहेत.

मी दैठणा येथे माझ्या आयुष्यातील सुंदर काळ व्यतीत केला. त्या बालपणातील सर्व ते प्रसंग आजही माझ्या नजरेसमोर उभे राहतात.

संत श्री ठाकुरबुवा महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या संतांची भूमी असलेल्या दैठणा येथे माझ्या बालपणीचा काळ व्यतीत झाला हे मी माझे परमभाग्यच समजतो.

आज आषाढी एकादशीच्या पावन दिवशी मनात सकाळीच दैठणा गावाची आठवण झाली व त्या सर्व बालपणीच्या आठवणी स्मृतिपटलावर अधोरेखित झाल्या.

रामकृष्ण बळीरामपंत जोशी
परभणी
भ्र.नं.९५२७४५४१८२

दैठणा येथे आमचे वास्तव्य पांडे गल्लीत आबांच्या वाड्यात डी.एन. कुलकर्णी सरांच्या ( दामुअण्णांच्या) जागेत होते. तो जुना दगडी वाडा, वाड्यातील दोन लादण्या, वाडयासमोर लिंबाचे झाड त्या झाडावर माकड व वानरांचा धुमाकूळ, गल्लीतील सवंगडयासमोर विटी -दांडू ,लपणाछपणी खेळतानाचे दृश्य, गल्लीतील शाहुमामांचा वाडा, शेजारी असलेला नागेशदादांचा वाडा, पाठभिंतीला असलेला जोशीकाकांचा वाडा,

संत ठाकुरबुवां महाराजांच्या मंदिरातील विठ्ठल व रुक्मिणी मातेची ती विलोभनीय मूर्ती, तसेच बुधवारचा आठवडी बाजार या सर्व गोष्टी आजही ह्रदयातील बालपणीच्या आठवणी स्मरणात ठेवल्या आहेत.

याच ठिकाणी माझ्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला.

वाड्यातील आबा, मामी तसेच माझ्या पहिल्या गुरु देशपांडे बाई यांनी माझ्यावर केलेल्या संस्कारामुळे मी घडलो. अवधूतदादा, विश्वासदादा, नरेशदादा यांनी दिलेले भावाचे प्रेम मी विसरु शकत नाही.

विश्वासदादा आता परभणीला वास्तव्यास आहे त्याची अधूनमधून भेट होते.

मला आई म्हणायची रक्ताच्या नात्यापेक्षाही सहवासाचे नाते खूप मोठे असते. सांगायचे तर काहीतरी ऋणानुबंध असतो त्याशिवाय गाठीभेटी होत नाहीत.

त्या असंख्य आठवणीं मनात घर करून आहेत.त्या सर्व बालपणीच्या आठवणी मी शब्दबद्ध करणार आहे.

## गमतीदार किस्से

# खिचडीची गंमत

**ज्योतिर्मय साहित्य**

नेहमीप्रमाणे सुट्टी अन् रविवारचा दिवस उगवला..

रविवार म्हणजे प्रत्येक गृहिणीची कामे जरा निवांत असतात.. कारण मुलांच्या शाळा नसतात पतीराजांच्या ऑफिसला सुट्टी असते. कशाचाही अन् कुणाचाही मागे तगादा नसतो, गडबड नसते, रिमोट हातात दिला की ‘‘सर्व मंडळी एकाच छताखाली‘‘ त्यामुळे आपण आपली जास्तीची कामे निवांतपणे करू शकतो... रोजच्या प्रमाणे माझी ही दुपारची कामे आटोपून संध्याकाळ होत आलेली आणि फोनची घंटी वाजली...

पहाते तर काय मैत्रिणीचा फोन ... अगं ऐकतेस का... माझ्या सासूबाई हॉस्पिटलमध्ये ऍडमिट आहेत... मी तिला पुढे बोलण्याची संधी न देता हक्काने म्हटलं तिला.. इकडेच तुझा डबा वगैरे जेवण करते..

तू कांही बाहेरून मागवू नकोस... झालं, लागल्या बाईसाहेब कामाला...

दिवसभराची कामे आटपून.... संध्याकाळचा टिफिन मैत्रिणीने सांगितला...तशी सुरूवात,

आणि किस्सा असा झाला की, ती म्हंटली अगं लाईट असं काहीतरी बनव रात्रीची वेळ आहे तर चपात्या, भाकरी असं कांही राडा करत बसू नकोस... मी म्हटलं बरं..

मग काय करू, तू जे सांगशील ते मी बनवते..

तिच्या हुकूमावरून मस्तपैकी खिचडीचा बेत ठरला...

गरम गरम राजस्थानी मसालेदार खिचडी, साजूक तुप घालून पापडचुरी, आणि टोमॅटो सार.. असा बेत ठरला...

आता मजेचा किस्सा असा घडला, जो मला खूप काही शिकवून गेला..

लगबगीने मी ही टिफीन द्यायचा आहे... या गडबडीने स्वयंपाकास सुरुवात केली,

खिचडी फोडणी टाकताना परत दवाखान्यात असलेल्या मैत्रिणीचा फोन आला.... तिच्याशी बोलत बोलत मिठा मिरचीच्या डब्यातील एका कप्प्यात फोडणीची सामग्री काढून तिला काय हवे, काय नको अशा गप्पा करत मी खिचडीला फोडणी दिली... आणि त्या फोनच्या नादात जे मी एका कप्यामध्ये खिचडीचा मसाला करून ठेवला होते तो खिचडीत न टाकता, दुसऱ्या लाल मिरचीची पावडर असलेला अर्धा कप्पा खिचडीमध्ये माझ्याकडून टाकला गेला.. आणि फोडणी झाल्यावर मिठा मिरचीचा डबा जाग्यावर ठेवून दिले.. त्यामुळे लक्षात कांहीच आले नाही, की मी कोणत्या कप्यातली सामग्री टाकली ती... असो.. खिचडी रेडी-टू-सर्वींगसाठी तयार.. आता हॉस्पीटलसाठी टिफीन भरून रवाना झाला... इकडं घरातील सदस्य ही जेवणासाठी बसले...आणि आवाजावर आवाजाचे बॉम्ब माझ्या नावाने माझ्या कानावरती पडू लागले... बाहेर येवून पहाते तर काय... सर्वांचा एकच आवाज चालू होता माझ्या नावाने...जी मी एक उपाधीने ओळखली जाणारी नव्हती... तर अनेक उपाधीने माझ्या नावात बदल झालेला होता. तो म्हणजे प्रत्येक मुलीचं लग्न झालं की खूप मोठमोठ्या उपाधीने तिची ओळख होत असते...

पहीली उपाधी..
अगं ऐकतेस का जरा इकडं ये...
ए आई..
ओ भाभी...
अगं सुनबाई...
ओ मोठी आई...
अशी सुमधूर उपाधीची गर्जना माझ्या कानी...

मी ही लगबगिने जाऊन पोहोचले...

काय झालं कांही चुकलं का माझं... आधी खिचडी तर खाऊन पहा... खूप छान झाली आहे त्यामुळे तुम्हाला बोलावले..

मलाही मनोमनी आनंद झाला इतकी छान खिचडी झाली माझ्याकडून...

पाहते तर काय ?

बापरे मी जिभेवर पण ठेवू शकले नाही...हुशश

आधी स्वयंपाकघरात पळाले अन् जाऊन मिठा मिरचीचा डबा उघडून पाहते तर काय, जी खिचडीची थोडीशी सामग्री होती ती तशीच होती अन् लाल मिरची पूडचा कप्पा खाली होता...तशीच मी अन् माझी गाडी दवाखान्याच्या दिशेने सुसाट निघाली. हॉस्पिटलला डबा पोहोचण्या आधी मी पोहोचले... अन् त्या मिरचीच्या कचाट्यातून सगळ्यांचा पोटोबा वाचवले...

मग काय परत नवे देव, नवे पुजारी असं म्हणत घरी येऊन परत मस्तपैकी

फोनवर न बोलता शांतपणे छान पैकी भाजी आणि भाकरी करून हॉस्पिटलला सुटसुटीत डबा पोहोच केले...

परत ही चूक आयुष्यात कधीही या हातून अद्यापही घडली नाही... आणि आज एक सुगरण म्हणून मोठी पदवी रोज दिली जाते..

सौ.भाग्यश्री दायमा, पुणे.
९८५०११४३३९

कुणी पाहुणा येणार असेल तर आम्हा मारवाडी लोकांमध्ये ताटात २१, मेनू तरी असायलाच हवे...आता इथं २१ शब्दाचा खुलासा संक्षिप्त मध्ये करते...

नाही तर तुम्ही म्हणाल २१ मिठाया.. तर तसं नाही हं मंडळी....

ताट सजवताना ताटामध्ये कांही मिठाया, वेगवेगळ्या चटण्या, लोणचे, सॅलड, नंतर जेवणाचा मेन बेस, असे बरेच पदार्थ... हे पदार्थ एकाच वेळी करण्याची सुंदर कला माझ्यात आपसुकच येत गेली. आता तर काय स्वयंपाक म्हणजे सर्वात आवडणारा विषय हो..रोजच्या दैनंदिनीमध्ये सहजच भाज्यांमधे सामग्री टाकते पण इतकी झक्कास कशी गं होते.. हे सुमधुर शब्द कानी ऐकले नां, की दहाजणांचा स्वयंपाक करण्याचं बळ परत तयार होतं..

आम्हा बायकांना काय पाहिजे हो..

बस् ‘‘प्यार के दो मिठे बोल‘‘

तेव्हा समोरच्या व्यक्तीच्या मुखारविंदातून आशिर्वादाचे फुले आणि तृप्तीची ढेकर देवून तृप्त झालेला आत्मा हेच माझे समाधान. पण तो खिचडीचा किस्सा स्मरणातून निघून गेलेला माझे मित्र संजय व्यापारी यांनी या हास्य विनोदाला परत एकदा उजाळा दिला त्या बद्दल खूप खूप आभार,

लेख लिहीताना तो क्षण आठवत होता, आणि मनातल्या मनांत हसणं ही खूप येत होतं ते या लेखणीने टिपले...

त्या सुंदर विस्मृतीचा, छान अनुभव मला खूप कांहीं शिकवून गेला.....अशा चुकांमधून माणूस खूप हुशार होत जातो.. हे मात्र नक्की..!

मस्त खा स्वस्थ रहा आनंदाने हसत रहा..

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559